अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. ३० मे २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २४० वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## फडणवीस राज यांना भेटले; चर्चेला उधाण



✔ **मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीसाठी शिवतीर्थ येथे पोहचले आहे. रात्री सव्वादहाच्या दरम्यान उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी राज ठाकरेंची भेट घेतली आहे. या दोन दिग्गज नेत्यांमध्ये एक तासांपेक्षा जास्तवेळ चर्चा झाली आहे. या भेटीमुळे राजकिय चर्चा रंगत आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी राज ठाकरे यांची भेट घेणं ही भाजपची मुंबई महापालिका निवडणुकीसाठीच्या मोठ्या रणनीतीचा भाग असण्याची शक्यता राजकिय विश्लेषकांकडून व्यक्त होत आहे. राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात नुकतेच कर्नाटक विधानसभा निवडणूक निकालानंतर शाब्दिक युद्ध रंगलेले महाराष्ट्राने पाहिले होते. राज ठाकरे यांनी कर्नाटक निकालातून जनतेला गृहित न धरण्याचा बोध घेण्याचा सल्ला भाजपला दिला होता. त्यावरुन फडणवीस यांनी बाहेरच्यांनी आम्हाला सल्ले देऊ नये, असे राज यांना सुनावले होते. नाशिक जिल्हा दत्तक घेण्याचे विधान फडणवीसांनी २०१७ मध्ये केले होते. त्याची आठवण राज ठाकरे यांनी गेल्या काही दिवसांत पत्रकारांना करुन दिली होती. नाशिक दत्तक घेणारे आता कुठे आहेत? असा सवाल करत राज यांनी फडणवीसांना जोरदार टोला लगावला होता. या शाब्दिक वादानंतर फडणवीस आणि राज ठाकरे यांची ही पहिली भेट आहे.

### खेळाडू असल्याचा खोटा दावा
## दोन नायब तहसीलदारांची निवड एमपीएससीकडून रद्द


✔ **मुंबई :** पात्र खेळाडू असल्याचा दावा करत एमपीएससीमधून नायब तहसिलदार पदावर निवड झालेल्या दोन नायब तहसिलदारांची निवड आयोगाने रद्द ठरवली आहे. अनिल बाबुराव पाटील आणि जयश्री गोविंद नाईक असं या दोघांची नावं आहेत. एमपीएससीने सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती दिली आहे. अनिल बाबुराव पाटील आणि जयश्री गोविंद नाईक या दोघांनी आपण परीक्षेसाठी पात्र खेळाडू असल्याचा दावा करत खेळाडूंसाठी आरक्षित असलेल्या कोट्यातून पदं घेतली होती.

## दक्षिण सोलापूर तालुक्यात काही ठिकाणी सौम्य भूकंपाची नोंद

✔ सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील काही ठिकाणच्या परिसरात १.३ रिश्टर स्केलच्या भूकंपाची नोंद झाली आहे. हा भूकंप खूप कमी तीव्रतेचा असल्याने कोणतीही जीवित व वित्त हानी झालेली नाही. तरी नागरिकांनी अफवांना बळी न पडता कोणत्याही प्रकारची भीती बाळगू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तुषार ठोंबरे यांनी केले आहे.

यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शमा पवार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे, दक्षिण सोलापूर तालुक्यातील आचेगाव, होटगी स्टेशन, मंद्रुप, हिपळे, फताटेवाडी, औज आहेरवाडी, तिल्हेहाळ, कणबस व बोरूळ या परिसरामध्ये आज २९ मे रोजी रोजी दुपारी १.२० वाजेच्या दरम्यान सौम्य आवाज ऐकू आल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची बाब तहसिलदार दक्षिण सोलापूर यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या निदर्शनास आणून आणून दिली. सदर बाबीची पडताळणी करिता, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी, नवी दिल्ली यांच्याकडे शहानिशा केली असता, सोलापूर शहर (वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) परिसरातील नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या भूकंप मापक



स्टेशनमध्ये १.३ रिश्टर स्केलच्या भूकंपाची नोंद झाली असल्याचे सांगितले. तरी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, उपरोक्त स्केलचा भूकंप खूप कमी तीव्रतेचा असल्याने कोणतीही जीवित व वित्त हानी झालेली नाही. तरी नागरिकांनी अफवांना बळी न पडता कोणत्याही प्रकारची भीती बाळगू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

## सोलापूरकर पुन्हा होरपळले




✔ **सोलापूर :** सोलापूर शहराचे तापमान सोमवारी ४२.२ अंश सेल्सिअसपर्यंत गेले होते. उन्हाच्या चटक्यानी सोलापूरकरांची होरपळ झाली. सायंकाळी ढगाळ हवामान तयार होऊन शहरात काही ठिकाणी पावसाच्या सरी पडल्या.

# आनंदी यात्रेचा 'प्रवास' वाटेतच संपला

# यल्लम्मा देवीचा आशीर्वादही नाही तारला

## ● होस्पेटजवळ भीषण अपघातात पती-पत्नी, २ चिमुरड्यांसह ६जण ठार
## ● दक्षिण सोलापूर तालुक्यातील लवंगी गावावर शोककळा

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

**सोलापूर-बंगळुरू हायवेवरील कर्नाटकातील होस्पेटजवळच्या दोट्टीहाळ या गावाजवळ ट्रक आणि कारच्या भीषण अपघातात सहा जण जागीच ठार झाले. त्यामध्ये दक्षिण सोलापूर तालुक्यातील लवंगी येथील चार जण तर इंडी तालुक्यातील दोघांचा समावेश आहे. रविवारी सायंकाळी ही दुर्घना घडली. ट्रकची धडक लागल्यानंतर कारचा चेंदामेंदा झाला. लवंगीहून कारने बेंगळुरूकडे निघालेले दोघे पती-पत्नी, त्यांची दोन मुले अशा चार जणांचा तसेच इंडी तालुक्यातील नंद्राळ गावच्या त्यांच्या दोन नातेवाईकांचाही चिरडून मृत्यू झाला. लवंगी गावातील श्रीयल्लम्मा देवीची यात्रा आटोपून याच गावातील कांबळे कुटुंबिय बंगळुरूकडे चालले होते. यात्रेचा आनंद घेवून कामाच्या ठिकाणी परतणाऱ्या या दाम्पत्याचा प्रवास वाटेतच थांबला. देवीचा आशीर्वादही त्यांना तारू शकला नाही. ही दुःखद वार्ता कळताच सोमवारी लवंगी गावावर शोककळा पसरली.**

राघवेंद्र सुभाष कांबळे (वय वर्षे २५), जानू राघवेंद्र कांबळे (वय वर्षे २३), राकेश राघवेंद्र कांबळे (वय वर्षे ५) व रश्मिका राघवेंद्र कांबळे (वय वर्षे २) (सर्वजण राहणार लवंगी, ता.दक्षिण सोलापूर) असे या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. राघवेंद्र कांबळे हे सोलापूरच्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील लवंगी गावचे रहिवासी होते. बेंगळुरू येथील खासगी कंपनीत नोकरीला होते. ते पत्नी आणि दोन मुलांसह बेंगळुरू येथे रहात होते. लवंगी येथे यल्लम्मा देवीची यात्रा होती. त्यानिमित्ताने कांबळे परिवार गावाकडे आले होते.

गावची यात्रा आटोपून राघवेंद्र कांबळे हे पत्नी आणि दोन मुलांसह बेंगळुरूकडे जात होते. यावेळी इंडी तालुक्यातील नंद्राळ गावच्या दोघा नातेवाईकांनाही त्यांनी सोबत कारमध्ये घेतले. संतोष व खाजू अशी त्यांची नावे आहेत. राघवेंद्र कांबळे हे आपल्या खासगी कारने जात होते. कर्नाटकमधील होस्पेटजवळ असलेल्या दोट्टीहाळ येथे त्यांच्या कारला ट्रकने धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, कांबळे यांच्या कारमधील सर्वजण जागीच ठार झाले.







### आई-वडिलांना जबर धक्का...

राघवेंद्र कांबळे हे पंधरा दिवसांपूर्वी आपल्या मूळगावी लवंगी येथे आले होते. दरवर्षी यल्लमा देवीच्या यात्रेसाठी येत होते. रविवारी ते बंगळुरूला जाण्यासाठी आपल्या कारमधून दोन मुले व पत्नीसह गेले. नंद्राळ इंडी येथील बहिणीच्या नातेवाईकांना घेऊन ते पुढील प्रवासासाठी निघाले. हॉस्पेटच्या पुढे गेल्यानंतर भरधाव ट्रकने त्यांच्या कारला समोरून जोराची धडक दिली. यामध्ये ट्रकच्या खाली कार अडकली. अपघात इतका भयंकर होता की- कारमधील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला. राघवेंद्र कांबळे हे एकुलते एक होते. वडील सुभाष आणि आई इंदुमती यांना या घटनेने धक्का बसला आहे. राघवेंद्र याना तीन विवाहित बहिणी आहेत.

### सामूहिक अत्यंसंस्कार...

राघवेंद्र कांबळे हा बेंगलोर येथील रेडमी मोबाईल सर्व्हिस सेंटर मध्ये काम करत होता. एकुलता एक कमवता मुलगा गेल्याने आई वडिलांचे छत्र हरपले. आई वडील हे शेतमजूर म्हणून काम करतात. सोमवारी सकाळी चौघांचे मृतदेह आणले. त्यानंतर दहा वाजता शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर अत्यंसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

## सिमेंट टँकरच्या धडकेने विवाहिता ठार; पती जखमी

### भंडीशेगाव येथील घटना

✔ **सोलापूर :** ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात सिमेंटचा मिक्सर दुचाकीला पाठीमागून धडकल्याने पत्नी जागीच ठार तर पती गंभीर जखमी झाला. हा अपघात रविवारी सकाळच्या सुमारास भंडीशेगाव (ता. पंढरपूर) येथील पुलावर घडला.

योगिता स्वप्निल शिंदे (वय २५ रा.लवंग ता . माळशिरस) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे . त्या आपले पती स्वप्नील शिंदे यांच्या दुचाकीवर पाठीमागे बसून वेळापूर मार्गे लवंग येथे निघाल्या होत्या.

भंडीशेगाव येथील पुलावर आले असता पाठीमागून एमएच०५-के-९९४२ या क्रमांकाचा मिक्सर धडकल्याने त्या खाली कोसळल्या. त्यानंतर टँकरचे चाक अंगावरून गेल्याने त्या जागीच मयत झाल्या. या अपघाताची फिर्याद स्वप्नील शिंदे यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात दाखल केली. पोलिसांनी अपघातानंतर पळून गेलेल्या ड्रायव्हर विरुद्ध गुन्हा दाखल केला. फौजदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## पाटकूल येथे बांधकाम कामगाराचा खून

✔ सुराज्य/मोहोळ

बांधकामांवर काम करणाऱ्या एकाने दुसऱ्या बांधकाम कामगाराला लाकडाने मारहाण करुन खून केला ही घटना पाटकूल येथे सोमवारी सकाळी पावनेसात वाजणे पूर्वी घडली.

विश्वजीत विरसेन देशमुख यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादीची चुलती जोत्स्ना देशमुख यांच्या मोबाइलवरून विश्वजीत यांना सकाळी पावनेसात वाजणेच्या सुमारास फोन आला बांधकामावर काम करणारा कामगार बोलला तो म्हणाला साहब मै पुरवराम बोल रहा हु आप जल्दी साईड पे आजाओ असे म्हणाल्याने ते लगेच साईडवर गेले असता तो म्हणाला साहब कृष्णा को किसी ने मारा है वो खून मे अंदर पडा है असे म्हणाल्याने आत मध्ये जावून पाहिले असता तळ मजल्या वरील हॉलचे लोखंडी कॉटवर रक्ताचे थारोळ्यात पडला होता यावेळी फिर्यादी देशमुख यांनी त्याच्या नातेवाईकांना बोलावून घेतले पुखराम यास विश्वासात घेऊन विचारले असता तो म्हणाला रात को खाना नही देता था खाना बनानेके बर्तनभी नही देता था इसलिए मैने उसको लकडीसे मारा असे सांगितले यावेळी त्यांनी त्यांचे चुलते प्रभाकर देशमुख यांना बोलावून घडला प्रकार सांगितला त्यांनी पोलिसांना बोलावले व त्यास पोलिसांच्या ताब्यात दिले. याबाबत पुखराम सिताराम निसाद रा छत्तीसगड याने दुसरा कामगार कृष्णा निसाद यास सोमवारी सकाळी पावनेसात वाजणे पूर्वी जेवण देत नाही जेवण बनवायची भांडी देत नाही म्हणून चिडून जावून त्याचा खून केला म्हणून पुखराम सिताराम निसाद यांच्यावर गुन्हा दाखल केले.

## अपघातामधील जखमी तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

✔ **सोलापूर :** अक्कलकोट मार्गावरील कर्जाळ येथे दुचाकीच्या अपघातामध्ये जखमी झालेला देविदास ज्ञानेश्वर शिवशरण (वय २५ रा.गांधीनगर, अक्कलकोट रोड सोलापूर) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी दुपारी मरण पावला. कर्जाळ येथील देशमुख पेट्रोल पंपाजवळ अपघातामध्ये तो जखमी झाला होता.






### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अचानक येतो अन् झोडपून जातो!!!

कल्याण
122-54-257

मेन बाजार
270-95-780

## भाजपच्या नव्या 'प्लॅन'मुळे शिंदे गटात अस्वस्थता

✔ सुराज्य/सोलापूर

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीने बी प्लॅन तयार केला असून मोदी ॲट रेट९ या मोहिमेंतर्गत सोमवारपासून जनसंपर्क अभियान सुरू केले आहे.त्याचा आरंभ गोदातिरी नाशिक येथे करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने राज्यातील २२ लोकसभा मतदारसंघांवर दावा ठोकल्यानंतर भाजपनेही 'प्लॅन बी'द्वारे लोकसभेच्या ४० जागा जिंकण्याचे ध्येय ठेवले. भाजपच्या या हालचालीने शिंदे गटात अस्वस्थता पसरली आहे.

शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने राज्यातील लोकसभेच्या २२ जागांवर दावा केला असताना, भाजपने 'मिशन २०२४'वर काम सुरू करून, शिवसेनेच्या १३ खासदारांच्या मतदारसंघांवर संयोजक नियुक्त केले. त्यामुळे भाजपच्या 'प्लॅन बी'वरून शिवसेना-भाजप युतीत मिठाचा खडा पडण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयातील सत्तासंघर्षात न्यायालयाने भरत गोगावलेंची प्रतोद पदावर केलेली नियुक्ती बेकायदा ठरवली आहे. एवढेच नव्हे तर शिवसेनेची घटना तपासून शिवसेना पक्ष नेमका कोणाचा हे ठरविण्याचे अधिकार विधानसभा अध्यक्षांना दिले आहेत. त्यामुळे १६ आमदारांच्या अपात्रतेच्या निर्णयासह शिवसेनेचाही निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना घ्यावा लागणार आहे. हा निकाल शिंदे गटाची धाकधूक वाढवणारा आहे. या निकालाने भाजपच्या कोअर गटातही चिंतेचे वातावरण असून, दोन्ही पक्षांतील धूसफूस वाढू लागली आहे.

राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांमध्ये संयोजकांची नियुक्ती करून, तेथे भाजपची ताकद वाढविण्याचे काम सुरू आहे. विशेष म्हणजे शिवसेनेच्या १३ खासदारांच्या मतदारसंघांमध्येही 'वजनदार' नेते संयोजक नेमण्यात आले आहेत.

### आम्ही काय करायचे?

भाजपने शिंदे गटाच्या मतदारसंघात संयोजक नेमल्यावरून शिंदे गटाच्या खासदारांमध्ये नाराजीची भावना आहे. 'आम्हाला विश्वासात न घेताच भाजपने ही कृती केल्याने तणाव निर्माण होऊ शकतो,' असा दावा एका खासदाराने केला. 'भाजपचा हा प्रयत्न आम्हाला आव्हान देणारा असल्याचे मत आणखी एका खासदाराने नोंदवले. आम्ही भाजपच्या चिन्हावर कदापि निवडणूक लढवणार नाही,' असा दावाही या खासदाराने केला आहे.